लोकमत

# भुयारी मेट्रो-३चे काम सुसाट



देशातल्या पहिल्यावहिल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३चे काम वेगाने सुरु आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून प्राप्त माहितीनुसार, माहीम येथील शितलादेवी स्थानकातील ९२ टक्के उत्खनन पूर्ण झाले आहे.



## शितलादेवी स्थानकातील ९२ टक्के उत्खनन पूर्ण

बेस स्लॅब आणि कॉन्कोर्स स्लॅबचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. या स्थानकास ८ क्रॉस पॅसेज असतील. हे क्रॉस पॅसेज न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीचा वापर करून बांधण्यात येत आहेत. याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. दरम्यान, प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८७ टक्के भुयारीकरण व ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. सध्या विविध भागात भुयारीकरण सुरु आहे. येत्या काही महिन्यात आणखी काही भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण होणे अपेक्षित आहे.